39899-44

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(नूतनीकरणाने)**

जाक्र.प्राशि-३/खाप्राशा/मा./पुवि/०८-०९
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 14 NOV 2008

प्रति

१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२) शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,पिंपरी-चिंचवड,पुणे.

विषय सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात परवानगी मिळालेल्या नविन खाजगी प्राथमिक शाळेस सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरणाने परवानगी देणेबाबत. . .

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राशा-१७०६/(११४/२००६)/प्राशि-३ दिनांक १६ मे २००६
२. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र. नमाशा-२००७/(९८६/०७) दिनांक १९ ऑक्टोबर २००७
३.आपले पत्र क्र. ४३०१/खाप्राशा/ २००८-०९ दिनांक २७/८/२००८

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र.३ चे पत्र कृपया पहावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमासाठी सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापी संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु न करता सदरची शाळा सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. २ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००८ पासून इ. १ ली च्या वर्गास फक्त एका तुकडीस शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १ | श्री.स्वामी शिक्षण संस्था,काळेवाडी,पुणे १७ | कोकणेनगर,काळेवाडी, पुणे | पहिली | इंग्रजी | जून २००८ पासून |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली उपाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि पक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ या पत्रान्वये नूतनीकरणाने शाळा परवानगी देवूनही शाळा सुरु न केल्यास भविष्यात सदर शाळेस कोणत्याही कारणास्तव नूतनीकरणाने परवानगी दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

(कु-हाडे एस.जे.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.करिता

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

४ मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
५ मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
६ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,-पुणे--------- यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७ मा. सचिव/अध्यक्ष,
श्री.स्वामी शिक्षण संस्था,काळेवाडी,पुणे १७.

**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे – १.**
दुरध्वनी क. ०२०-२६१२२६९६ फॅक्स क. ०२०-२६१२२२१७
संकेत स्थळ : dydepune.com ई-मेल : dydpune@gmil.com

---

जा.क्र. शिऊसं/माध्य-३०३/तात्पुरता सांकेतांक क्र./पुवि/२०२१ | 286
दिनांक : 13 JAN 2021

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५

**विषय :- माध्यमिक शाळेस तात्पुरता सांकेतांक क्रमांक मिळणेबाबत**
शारदा इंग्लिश मिडियम स्कुल, राहटणी , काळेवाडी , पिंपरी, पुणे

संदर्भ : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र
जा.क्र./शिक्षण/कावि/३३७६/२०२० दिनांक ०९/११/२०२०

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचे संदर्भिय पत्रान्वये श्री.स्वामी समर्थ शिक्षण संस्था संचलित शारदा इंग्लिश मिडियम स्कुल, राहटणी ,काळेवाडी, पिंपरी, पुणे या स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर इंग्रजी माध्यम माध्यमिक विदयालयास सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातील इ.१० वी च्या मार्च-२०२१ परिक्षेकरिता जून-२०२० पासून नविन तात्पुरता सांकेतांक क्रमांक व मंडळ संलग्नता मिळणेबाबत शिफारस केलेली आहे.

तदअनुषंगाने सदर माध्यमिक विद्यालयास या कार्यालयामार्फत एक वर्षाच्या आत खाते मान्यता घेण्याच्या अटीवर आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या शिफारशीस अधिन राहून सदर विद्यालयास नविन तात्पुरता सांकेतांक क्रमांक व मंडळ संलग्नता मिळणेकामी हे कार्यालय सहमत आहे.

(औदुंबर उकिरडे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

प्रत : माहितीसाठी रवाना
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे
२. मुख्याध्यापक, शारदा इंग्लिश मिडियम स्कुल, राहटणी , काळेवाडी , पिंपरी, पुणे

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता /पुवि/२०१९-२०४२५२

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक : 16 OCT 2019

प्रति

अध्यक्ष /सचिव,

श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्था.

विषय :- सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत....

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६ व २४) २०१२

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २० जुन २०१२

३. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एमएफएस-२०१९/प्र.क्र.७८९२/ एसएम-२ दिनांक २०.०८.२०१९

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता / विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदाराचे संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा /दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग / इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्था | शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल राहटणी, काळेवाडी, पिंपरी पुणे | इंग्रजी | राज्यमंडळ | माध्यमिक (इयत्ता ८ वी ते इयत्ता १२वी) | २०१९-२० |

अटी व शर्ती :-

१ शासन निर्णयातील अट क्र. १ नुसार सदर संस्थेने लगतच्या तीन लेखापरिक्षण अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे या बाबीची पुर्तता न केल्यास सदर शाळेचे मान्यता आदेश आपोआपच रद्द समजण्यात येईल. शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद पुणे यांनी सदर शाळेस प्रथम मान्यता देताना उपरोक्त अटीची पुर्तता झाली किंवा नाही याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयाकडून खात्री करुनच प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२ सदर शाळेनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतुदीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३ पात्र ठरलेल्या संबंधित शाळेया व्यवस्थापनाने अधिनियम,२००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

४ ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्मक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे अर्ज करावेत

५ ज्या व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे, अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.

६ परवानगी देण्यात आलेल नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना शासनांच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

७ संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम,२००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी

८ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

९ यु-डायस डाटा - या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District infofmation System For Education) मध्ये माहिती भरतांना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधीत संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याप्रमाणे संस्थेने, सर्व संबधितांच्या माहितीकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा /दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहिर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

१० परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरण्याप्रमाणे करावी

(मिनाक्षी राऊत)

शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनाय, महाराष्ट्र राज्य, पुणे.